छत्रपत्री शिवाजी महाराज वनश्री पुरस्कारासाठी सुधारित गुणांकन पद्धती ठरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः सावनि-२०१८ /प्र.क्र.५४ /फ-११

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १७ जुलै २०१९

वाचा :-

१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. एसएलएफ-२००७/ प्र.क्र.१८८/ जल १२, दि. ३०.०६.२००८

२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.एसएलएफ-२०११/ प्र.क्र.४२/ जल १२, दि. २७.०६.२०११

३) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.एसएलएफ-२०१२/ प्र.क्र.७६/ जल १२, दि. ०६.०७.२०१३

४) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन पत्र क्रमांक एसएलएफ-२०११/ प्र.क्र.६६/ जल १२, दि. १९.०७.२०१३

५) प्रधान मुख्य वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे पत्र क्रमांक कक्ष-८/वनश्री/प्र.क्र.१/१५८१/२०१३-१४,पुणे-४११ ००१, दिनांक ११.०९.२०१३

६) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. एसएलएफ-२०१३/ प्र.क्र.९२/ जल १२, दि. ३०.०५.२०१४

७) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१४/प्र.क्र.१८८/ फ-५, दि. ०४.१२.२०१४

८) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१४/प्र.क्र.२४/ फ-११, दि. १८.०५.२०१५

प्रस्तावना :-

राज्यातील सामाजिक वनीकरणाच्या वनेतर क्षेत्रातील वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना सन्मानित करण्यासाठी सन १९८८ पासून वर नमूद केलेल्या शासन निर्णयाद्वारे दरवर्षी महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

संदर्भ क्र.७ येथील शासन निर्णयान्वये ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले सामाजिक वनीकरण संचालनालय व मंत्रालयीन स्तरावरील आस्थापना महसूल व वन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्काराचे नामाभिधान बदलण्यात आले असून **" छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार"** असे सुधारित करण्यात आले आहे.

संदर्भ क्र. ४ येथील शासन पत्रान्वये छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार निवडीच्या १० मुख्य निकषांमध्ये/ मुद्दयांमध्ये बदल न करता संबंधित मुद्दयांतर्गत काही नवीन उपमुद्दे देय ठरणाऱ्या

गुणांचा तक्ता तयार करुन त्याबाबत अभ्यास करुन अंतिम अभिप्राय / सुधारणा सुचविण्यासाठी प्रधान मुख्य वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे यांचेकडे पाठविण्यात आला होता. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण ,पुणे यांनी त्यांचे संदर्भ क्र. ५ येथील पत्रान्वये सदर सुधारित गुणांकन पद्धतीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला होता. त्यानुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार विजेते निवडीची प्रक्रिया करण्यात येत होती. मात्र सदर निकषांस औपचारीक शासन मान्यता अद्याप प्रदान करण्यात आली नव्हती. आता सदर निकषांस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार निवडीसाठी सोबतच्या विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे सुधारित गुणांकन पध्दतीस मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर पुरस्कार निवडीसाठी प्राथमिक छानंनी समिती सदस्यांनी विविध संवर्गातील प्रस्तावांचा आढावा घेऊन पुरस्कारासाठी व्यक्ती, ग्रामपंचायत, ग्राम/ विभाग/ जिल्हा/ शैक्षणिक संस्था व सेवाभावी संस्था या संवर्गाकरिता प्राप्त किमान गुणांची मर्यादा ५० आहे. सदर गुणांकनात शिथिलता देण्याचे अधिकार प्राथमिक समिती / राज्यस्तरीय मूल्यमापन समितीस राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१७१६४१०५८९१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.07.17 17:36:36 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक, (मंत्रालय)

सोबत : विवरणपत्र

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. सर्व मंत्री/ मा. राज्यमंत्री
५. मा. सर्व विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य
६. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
७. मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
८. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
९. प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय,, विधान भवन, मुंबई.
११.प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
१२.प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३.प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११.मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)
१२.वनसरंक्षक , सामाजिक वनीकरण (६ वृत्त)
१३.विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)
१४.महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
१५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.
१७.निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
१८. वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
१९.कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२०.कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२१.उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२२. निवडनस्ती/फ-११.

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र साववि-२०१८/ प्र.क्र.५४/ फ-११, दि. १७ जुलै २०१९ सोबतचे विवरणपत्र
छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार निवडीसाठी गुणांकन पद्धती

अ. क्र.	मुद्दा व विवरण	रोपे संख्या	गुण	शेरा
१	लोकांमार्फत सामाजिक वनीकरणाच्या कामासाठी रोपवाटीका स्थापन करणे.	२०००० च्या पुढे	१०	१. जंगल वनस्पतीसाठी गुण -३ २. प्रोत्साहन देण्यासाठी गुण-२ एकूण गुण-१५
		५००० ते २००००	८	
		१००० ते ५०००	६	
		१००० पेक्षा कमी	३	
२	शासकीय/सामुहिक अथवा खाजगी जमिनीवर सरपण/वैरण देणाऱ्या झाडांची लागवड	३०००० च्या पुढे रोपे लागवड	३०	१. जंगल वनस्पतीसाठी गुण -३ २. प्रोत्साहन देण्यासाठी गुण-२ एकूण गुण -३५
		२०००० ते ३०००० रोपे	२५	
		१०००० ते २०००० रोपे	२०	
		५००० ते १०००० रोपे	१५	
		५००० पेक्षा कमी रोपे	१०	
३	वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात ग्रामीण दुर्बल घटकांचा तसेच महिलांचा सहभाग	(अ) महिला बचत गटांना मिळालेला फायदा	२	एकूण गुण -५
		(ब) संबंधीत वृक्ष लागवड धारक व्यक्तीने /संस्थेने निर्माण केलेले कामाचे दिवस/श्रमदान	२	
		(क) खास ग्रामीण दुर्बलांना/महिलांना रोजगार पुरविणे	१	
४	वनीकरणाच्या माध्यमातून शाळकरी विद्यार्थी तथा महिला यांचे कल्याणार्थ केलेले कार्य.	(अ) शाळेच्या आवारात रोपे लागवड करुन दिली.	२	एकूण गुण -५
		(ब) शाळेला मोफत रोपे पुरविली.	१	
		(क) स्थानिक महिला मंडळांना रोपे पुरविली.	२	
५	सामूहिक लागवडीचे कुंपनाविना स्वयंस्फूर्तीने संरक्षण व देखभाल	(अ) ग्रामपंचायत/ गायरान क्षेत्रात चराई बंदी व कुऱ्हाड बंदी लागू केली.	२	एकूण गुण -५
		(ब) स्वयंसेवक गट तयार करुन त्याद्वारे संरक्षण/श्रमदान तत्वावर संरक्षण	२	
		(क) देखभाल व संरक्षणासाठी केलेली अन्य उपाय योजान	१	

६	अपारंपारीक उर्जा स्त्रोताचा वापर करणेसाठी जनतेला प्रोत्साहित करणे.	(अ) बायोगॅस उभारणे	२	एकूण गुण -५
		(ब) सूर्य चूल व सोलर दिवे वापरणे व इतर उपाय योजना	२	
		(क) बायोफयुअल निर्माण करणाऱ्या वृक्ष प्रजातीची लागवड (जॅट्रोफा,करंज इ.)	१	
७	वनीकरणाच्या संबंधात जनजागृती/ प्रसिध्दी व प्रेरणा याबाबतचे कार्य.	(अ) वृक्षदिंडीचे आयोजन	२	एकूण गुण-५
		(ब) व्याख्यान/स्तंभलेखन	१	
		(क) वन व पर्यावरण, पडीक जमीन विकास इ. विषयांवर पुस्तक लेखन व प्रसिध्दी	१	
		(ड) नाटक, एकांकिका, पथनाटय इ. कार्यक्रम करणे	१	
८	केलेल्या कार्याचा कालावधी व लागवडीविषयी जिवंत झाडांच्या टक्केवारीसह सद्यस्थिती	७० % पेक्षा जास्त	१५	एकूण गुण- १५
		६० ते ७० %	१०	
		५० ते ६० %	८	
		४० ते ५० %	७	
		४०% पेक्षा कमी	३	
९	केलेल्या कार्याविषयी काही प्रकाशने/प्रसिध्दी झाली असल्यास त्याच्या प्रती	(अ) स्थानिक वर्तमानपत्र/मासिक	१	एकूण गुण-५
		(ब) प्रादेशिक/राज्यस्तर वर्तमानपत्र/मासिक	१	
		(क) राष्ट्रीय स्तर वर्तमानपत्र/ मासिक	१	
		(ड) कृषी व वन यावरील खास प्रकाशित होणारे मासिक/जर्नलस इ.	१	
		(ई) आकाशवाणी/ दुरदर्शनवर प्रक्षेपित कार्यक्रम	१	
१०	हया अथवा अशा कामासाठी पूर्वी काही पारितोषिक, पुरस्कार प्रशस्तीपत्रके इत्यादी मिळाली असल्यास त्याचा तपशील	(अ) तालुकास्तरीय/ जिल्हास्तरीय	१	एकूण गुण-५
		(ब) विभागीय /राज्यस्तरीय	२	
		(क) केंद्र स्तरावर (शासनामार्फत प्रदान पुरस्कार, प्रशस्तीपत्र यास प्राधान्य राहील)	२	

या शिवाय शैक्षणिक संस्थाकडे उपलब्ध असलेल्या जमिनी मर्यादित असल्याने दि. ७ एप्रिल २००३ च्या शासन निर्णयातील प्रपत्र ब मधील १० मुद्यांच्या आधारे गुणांकन करताना मुद्दा क्र. १,२ व ८ चे गुणांकन खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे.

मुद्दा क्र.	मुद्दा व विवरण	रोपे संख्या	गुण	शेरा
१	लोकांमार्फत रोपवाटिका स्थापन करणे (१० गुण)	५००० च्या पुढे	१०	एकूण गुण -१०
		३००० ते ५०००	८	
		२००० ते ३०००	६	
		१००० ते २०००	४	
		१००० पेक्षा कमी	२	
२	शासकीय / सामुहिक अथवा खाजगी जमिनीवर सरपण /वैरण देणाऱ्या वृक्षांची लागवड (२० गुण)	५००० च्या पुढे	२०	एकूण गुण -२०
		४००० ते ५०००	१७	
		३००० ते ४०००	१५	
		२००० ते ३०००	१०	
		१००० ते २०००	०५	
		१००० पेक्षा कमी	०३	
८	लागवड केलेल्या रोपांपैकी जिवंत रोपांची टक्केवारी (१० गुण)	८० % पेक्षा जास्त	१०	एकूण गुण - १०
		७० ते ८०% पेक्षा जास्त	८	
		६० ते ७० %	७	
		५० ते ६० %	५	
		४० ते ५० %	३	
		४०% पेक्षा कमी	२	

मुद्दा क्र. ३,५ प्रत्येकी ५ गुण- एकूण गुण-१०
तसेच इतर मुद्यातील उपमुद्दयांचे गुण खालीलप्रमाणे दुप्पट होतील.
मुद्दा क्र. ४,६,७,९ व १० -प्रत्येकी गुण-१० , एकूण गुण-५० , एकूण एकंदर गुण-१००

वरीलप्रमाणे गुणांकन करताना प्रत्यक्षात लागवड केलेल्या रोपांची संख्या व त्यापैकी जिवंत रोपांची संख्या यांचा व वृक्ष लागवडीस प्रेरणा देणे याचाही तुलनात्मक विचार करणेत येईल.